श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे

# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर - II)

ता.शेवगांव,जि.अहमदनगर (महा.) पिन ४१४ ५०२

Email : kvkdahigaon@gmail.com Website : www.kvkdahigaon.org

✲ आम्हास फॉलो करा : kvk.dahigaon kvkahmednagar2 DahigaonKvk

कालावधी : ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२५ **ई न्युज लेटर** अंक क्र.२०२५/४

## शेतावर तंत्रज्ञान तपासणी (OFT) –

### विषय : ज्वारी पिकातील जास्तीत जास्त उत्पादन देणाऱ्या वाणाचा वापर –

ग्रामीण भागात अजुनही प्रचलित पद्धतीने मालदांडी ३५–१ या रब्बी ज्वारीच्या वाणाचा उपयोग पेरणीसाठी केला जातो. या प्रचलित वाणाचे अपेक्षित धान्य तसेच चारा उत्पादन मिळत नाही. म्हणून कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने यांनी रब्बी ज्वारीच्या जास्तीत जास्त उत्पादन देणारे परभणी सुपर मोती या वाणाची तपासणी चाचणी कोळगाव तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथील प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यास सुरुवात केली आहे. हे वाण जास्तीतजास्त धान्य त्याचप्रमाणे चारा उत्पादन देणारे वाण आहे.



### विषय : कांदा पिकाच्या एन.एच.आर.डि.एफ–रेड ४ या सुधारित वाणाचे मूल्यांकन करणे.

कांदा हे व्यापारिदृष्ट्या अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे भाजीपाला पिक बनले आहे. कांदा पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कलही वाढत आहे. शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख भाजीपाला पिक बनले आहे. कोळगाव येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अधिक उत्पादनक्षमता व टिकवनक्षमता असणार्या एन.एच.आर.डि.एफ–रेड ४ या सुधारित वाणाचे मूल्यांकन ही तंत्रज्ञान तपासणी चाचणी १० शेतकर्यांच्या शेतावर ४ हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात




### विषय : संत्रा पिकाच्या अधिक उत्पादनासाठी अर्का सायट्रस स्पेशलचे मूल्यांकन करणे.

पाथर्डी तालुक्यातील बागायती हलकया मध्यम जमीनीत संत्रा पिकाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. संत्रा पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल वाढत आहे. भोसे व परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख महत्वाचे पिक बनले आहे. संत्रा पिकामध्ये बहार व्यवस्थापनांनंतर शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात फुलगळ व फलगळ समस्येला सामोरे जावे लागते. पाथर्डी तालुक्यात संत्रा पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे भोसे येथे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी शिफारशीत खत मात्रा (८००:३००:६०० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश/ झाड) अधिक अर्का सायट्रस स्पेशल ५ ग्रॅम/लिटर फुलोऱ्यापूर्वी २ वेळा आणि फुलोऱ्यानंतर २ वेळा २० दिवसांच्या अंतराने स्टीकर व लिंबाचा रस वापरुन फवारणी करणे तंत्रज्ञान तपासणी चाचणी १० शेतकऱ्यांच्या शेतावर ४ हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात आली.




**विषय : ट्रॅक्टरचलित ऊस बेणे लागवड यंत्र.**

ऊस शेतीमध्ये दिवसेंदिवस वाढत्या लागवड खर्चाचे प्रमुख कारण म्हणजे मजूर समस्या. यावर मात करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने यांचे वतीने ट्रॅक्टरचलित एक ओळ ऊस बेणे लागवड यंत्राची शेतकऱ्यांच्या शेतावर चाचणी घेण्यात आली. या यंत्राच्या साह्याने, ऊसाचे दोन डोळे बेणे कापणे, सरी पाडणे व सरीत ऊस बेणे लागवड करणे तसेच खत पेरणी आणि तणनाशक फवारणी अशी पाच कामे एकाच वेळी केली जातात. या यंत्राच्या साह्याने एक एकर ऊस लागवडीसाठी २ तास लागतात. हे यंत्र चालविण्यासाठी कमीत कमी ४५ HP चा ट्रॅक्टर आवश्यक आहे. या यंत्रामध्ये ऊस पिकाच्या दोन सरीतील अंतर कमी जास्त करता येते. दोन सरीतील अंतर कमीत कमी ३ फूट ठेवता येते तर, त्यापेक्षा अधिक अंतर कितीही ठेवता येते.





**विषय : ट्रॅक्टरचलित कांदा बियाणे पेरणी यंत्र**

कांदा पिक लागवड खर्चाची बचत व शेतकऱ्यांचे मजुरांवरील अवलंबन कमी करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने यांचे वतीने ट्रॅक्टरचलित कांदा बियाणे पेरणी यंत्राची १० शेतकऱ्यांच्या शेतावर चाचणी घेण्यात आली. या यंत्राद्वारे कांदा बियाणे पेरणी करण्यासाठी एकरी २.५० किग्रॅ बियाणे लागते तसेच बियाणे पेरणी सोबत खत पेरणीची सुविधा देखील या यंत्रामध्ये देण्यात आली आहे. एक एकर कांदा बियाणे पेरणीसाठी एक तास पुरेसा होतो. हे यंत्र चालविण्यासाठी १८ HP चा ट्रॅक्टर आवश्यक आहे. कांदा पिकाची रोपवाटिका करून नंतर पुर्नलागवड पद्धतीने लागवड करत आहे. हा पुर्नलागवडीचा खर्च कमी करण्यासाठी व मजूर समस्येवर मात करण्यासाठी या ट्रॅक्टरचलित कांदा बियाणे पेरणी यंत्र तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना फायदा होईल.





**पथदर्शी प्रात्यक्षिक (FLD) -**

**विषय : गहू पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन देणारे जैव संतृप्त वाण एच. आय. 1633 व एच.आय. 1634 वाणांचा वापर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवागाव तालुक्यात रब्बी हंगामात गहू पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. यामध्ये प्रामुख्याने सरळ वाणांचा वापर केला जातो

त्यामुळे मानवी आहारात घेतले जाणारे अन्न सकस नसल्याने शरीराचे पोषण व्यवस्थित होत नाही. तसेच यापासून मिळणारे उत्पादन सुद्धा कमी प्रमाणात मिळते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान व कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने अंतर्गत हसनापूर, कोळगाव व मंगरूळ बु., तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथील शेतकऱ्यांसाठी गहू पिकाचे जैव संतृप्त वाण एच.आय. १६३३ व एच.आय. १६३४ चा वापर करून अपेक्षित धान्य उत्पादन तसेच आहारातून जास्त प्रमाणात प्रथिने, फेरस आणि जस्त ही पोषण द्रव्ये मिळविण्यासाठी प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर गहू पिक प्रात्यक्षिक रब्बी हंगाम २०२५ घेतले आहे.



**विषय : विद्राव्य खतांद्वारे रब्बी कांदा पिकामध्ये अधिक उत्पादनासाठी शिफारशीत खतमात्रेचा वापर**

अहिल्यानगर जिल्ह्यात कांदा पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. कांदा पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल वाढत आहे. नेवासा व शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख महत्वाचे पिक बनले आहे. रब्बी कांदा पिकामध्ये अन्नद्रव्यांचा असंतुलित वापरामुळे लहान आकाराचे कांदे तयार होऊन उत्पादनात घट येते. रासायनिक खतांचा वाढता तसेच असंतुलित वापर यामुळे उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. गादी वाफ्यावर कांद्याची लागवड करून विद्राव्य खतांच्या वापराद्वारे फर्टीगेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे. यासाठी कोळगाव व परिसरातील शेतकर्यांसाठी शिफारशीत खत मात्रेचा (१००:५०:५० कि/हे.) विद्राव्य खतांद्वारे वापर. (१ ते २१ दिवस–२०:३०:१०, २२ ते ४२ दिवस– ४०:४०:२०, ४३ ते ७० दिवस– ३०:२५:४०, ७१ ते ९१ दिवस–१०:०५:३० % नत्र: स्फुरद:पालाश ) हे पथदर्शी प्रात्यक्षिक १० शेतकऱ्यांच्या शेतावर ४ हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात आली.



**विषय : रब्बी कांदा पिकातील तण नियंत्रणासाठी तणनाशकाचा वापर.**

कांदा पिकाचे क्षेत्रामध्ये वाढ होत असली तरी कांद्याची हेक्टरी उत्पादकता खूप कमी आहे. हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी. कांदा पिकातील तण व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याने उत्पादन खर्चामध्ये वाढ होते. शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख भाजीपाला पिक बनले आहे. त्यामुळे कोळगाव येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कांदा लागवडीनंतर २५ दिवसांनी ओक्झीफ्लोरफेन १०मिली व फ्लूझीफोप–पी–ब्युटिल २५ मिली या तणनाशकाची १० लिटर पाण्यात फवारणी करणे हे पथदर्शी प्रात्यक्षिक १० शेतकऱ्यांच्या शेतावर ४ हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात आली.



**विषय : परसबागेतील कुक्कुटपालनामधे गावरान कोंबड्यांच्या कमी मांस व अंडी उत्पादनामुळे, संकरीत श्रीनिधी जातीच्या कोंबड्यांचा वापर करून मांस व अंडी उत्पादन वाढवणे.**

शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा परसबागेतील कुक्कुटपालन हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो यामध्ये प्रामुख्याने गावरण कोंबड्यांचा वापर केला जातो, परंतु गावराण पक्षांमध्ये अपेक्षित वजन वाढ व अंडी उत्पादन मिळत नाही. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगांव ने अंतर्गत शेतकऱ्यांसाठी नवीन संकरीत जात श्रीनिधी चा वापर करून अपेक्षित वजन वाढ व अंडी उत्पादन मिळवण्यासाठी प्रात्यक्षिक घेण्यात आले.




**विषय : अकयारोपाथोजेनिक बुरशी मेटाराहीझीअम अनिसोपली चा वापर करून संकरीत जनावरांमध्ये बाह्य परजीवीचे नियंत्रण करणे .**

शेवगाव तालुक्यातील संकरीत जनावरांमध्ये व्यवस्थापनाच्या अभावामुळे बाहयपरजीवी मुळे गोचीड ताप होण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे अपेक्षित दुग्ध उत्पादन मिळत नाही तसेच बऱ्याचवेळा संकरीत गायी दगावतात. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव ने अंतर्गत शेतकऱ्यांसाठी अकयारोपाथोजेनिक बुरशी मेटाराहीझीअम अनिसोपली शेतकऱ्यांना देण्यात आले. संकरीत जनावराच्या त्वचेवर या बुरशीचा फवारा महिन्यातून दोन वेळा करण्यात आला. यामधून बाह्यपरजीवी नियंत्रण झाल्याचे दिसून आले.



**विषय : तूर पिकामध्ये संजीवकाचे प्रात्यक्षिक**

खरिप हंगाम २०२५ मध्ये प्रगतशील शेतकऱ्याच्या शेतावर ४.० हेक्टर क्षेत्रावर सदरचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. तूर पिकामध्ये योग्य वेळी संजीवकांचा (Plant Growth Regulators - PGRs) वापर केल्यास फळगळ थांबते आणि उत्पादनात वाढ होऊ शकते . जिब्रेलिक ॲसिड (G-3) – ३५ पीपीएम या सारखी संजीवके फूल लागण्याच्या अवस्थेत फवारल्यास शेंगा भरण्यास आणि दाण्याचा आकार सुधारण्यास मदत होते . तूर पिकावर संजीवकांचा वापर केल्यास पुढीलप्रमाणे परिणाम आढळतात संजीवकांमुळे फुलांची संख्या वाढते आणि फूल धारणा चांगली होते. फूल आणि शेंगांची गळती कमी होते. जास्तीत जास्त फुलांचे रूपांतर शेंगांमध्ये झाल्यामुळे उत्पादनात भरीव वाढ होते. शेंगांमधील दाणे टपोरे आणि भरघोस होण्यास






## ग्रामीण युवक/युवतींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण –

### विषय : सेंद्रिय कृषि निविष्ठा निर्मिती आणि त्यांचा शेतीमध्ये वापर

कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव – ने च्या माध्यमातून ग्रामीण युवकांना कौशल्य आधारित सेंद्रिय कृषि निविष्ठा निर्मिती आणि त्यांचा शेतीमध्ये वापर या विषयाचे प्रशिक्षण आयोजन दिनांक ९ ते १४ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने येथे करण्यात आले. सदर प्रशिक्षणात २ महिला तसेच २९ परुष युवक शेतकरी असे ३१ युवक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणात सेंद्रिय कृषि निविष्ठा उत्पादन भविष्यातील संधी , सेंद्रिय कृषि निविष्ठा शेतीमध्ये महत्व, शेतीसाठी विविध सेंद्रिय कृषि निविष्टा तयार करणे व वापर, कंपोस्ट खत निर्मितीचे विविध प्रकार व त्यांचा वापर, सेंद्रिय कृषि निविष्ठा निर्मिती (किड व रोग नियंत्रण साठी ) जसे दशपर्णी अर्क, लसून मिरची अर्क, वेखंड अर्क, ब्रह्मास्त्र, अग्निस्त्र, इ. प्रात्यक्षिक, जैविक खते निर्मिती तंत्रज्ञान व त्यांचा शेतीमध्ये वापर , मायकोराइजा उत्पादन तंत्रज्ञान व त्यांचा शेतीमध्ये वापर, सेंद्रिय कृषि निविष्ठांचा भाजीपाला, सेंद्रिय कृषि निविष्ठांचा शेती पिके, फळपिके आणि फुल पिकांमध्ये वापर या विषयांबद्दल सहभागी प्रशिक्षणार्थीना अद्ययावत माहिती, कृति प्रात्यक्षिकद्वारे अवगत करण्यात आले.





### विषय : रोपवाटिका व्यवस्थापन

ग्रामिण भागातील युवक व युवतींसाठी कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने येथे रोपवाटिका व्यवस्थापन या विषयावर दिनांक २४ ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान ५ दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये जातिवंत व दर्जेदार रोपे निर्मितीसाठी रोपवाटिका स्थापनेची कार्यपद्धती, जागेची निवड आणि पूर्वतयारी, रोपवाटिकेतील मातृवृक्षांची लागवड आणि संगोपन, रोपवाटिकेतील विविध हत्यारे व औजारे, रोपवाटिकेकेतील अभिवृद्धीसाठी माध्यमे, साहित्य व अभिवृद्धीगृहे, रोपवाटीकेतील वाफे आणि अभिवृद्धीगृहांचे निर्जंतुकीकरण रोपवाटीकेतील झाडांची अभिवृद्धी, शासनाच्या रोपवाटिका विकासाच्या योजना, पुष्पगुछासाठी आवश्यक मातृवृक्षांची लागवड आणि संगोपन, पुष्पगुछ बनवणे इ. विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वेगवेगळ्या रोपवाटीकेना भेटी आयोजित करण्यात आल्या. सदर प्रशिक्षणामध्ये २९ ग्रामिण युवक व युवतींनी सहभाग नोंदवला.



### एकात्मिक शेती पद्धती

कृषी विज्ञान केंद्र दहिगाव ने वतीने पाच दिवसीय एकात्मिक शेती पद्धती या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक १७ ते २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये करण्यात आले. दिवसेंदिवस कमी होत चाललेली जमीनधारणा व उपलब्ध क्षेत्रामधून जास्तीचे उत्पन्न मिळवणे या अनुषंगाने या विषयाची निवड करण्यात आली. एकात्मिक शेती पद्धतीमध्ये पीक पद्धती बरोबर फळे, भाजीपाला, गाई, म्हशी, शेळीपालन, कुक्कुटपालन, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, आधुनिक ऊस शेती व ऊस रोपवाटिका, पाण्याचा काटेकोर वापर,

एकात्मिक अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन, शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना, सोलार आधारित शेती तसेच शेतकऱ्यांजवळ उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीचा योग्य उपयोग करून अधिक नफा मिळविणे हा एकात्मिक शेती पद्धतीचा व प्रशिक्षण आयोजित करण्याचा प्रमुख हेतू होता. या प्रशिक्षण वर्गात प्रक्षेत्र भेटीमध्ये एकात्मिक पद्धीतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतास भेटी देण्यात आल्या. परिसरातील आदर्श या प्रशिक्षण वर्गात एकूण ३५ ग्रामीण युवकांनी सहभाग घेतला.





**कृषि विस्तार अधिकारी प्रशिक्षण -**

**विषय : रब्बी हंगामातील पिकांचे एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञान**

तालुका कृषी अधिकारी शेवगाव यांचे अधिनस्त कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांचे दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी एकदिवसीय प्रशिक्षण कृषि विज्ञान दहिगाव ने येथे आयोजित करण्यात आले. यावेळी भागातील रब्बी हंगामातील महत्वाची पिके व त्यामधील एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञानाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी एकूण ३० अधिकारी व कर्मचारी हजर होते. प्रशिक्षण वर्गानंतर केंद्रातील विविध प्रात्यक्षिक प्रकल्प पाहणी करण्यात आली.



**विषय : निर्यातक्षम डाळींब व संत्रा उत्पादन तंत्रज्ञान**

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये फळ पिकांचे क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. डाळिंब, आंबा, केळी, संत्रा इ. पिकातून प्रती एकरी मिळणारा नफा इतर पिकांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल दिवसेंदिवस वाढत आहे. फळ पिकांमध्ये समस्या देखील वाढत आहेत. त्यासाठी कृषि विस्तार सेवकांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. या हेतूने दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ रोजी अहिल्यानगर येथे कृषि विस्तार सेवकांसाठी निर्यातक्षम डाळींब व संत्रा उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव-ने व उपविभागीय कृषि अधिकारी, अहिल्यानगर यांचे संयुक्त विद्यमाने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये ६१ कृषि विस्तार सेवकांनी सहभाग नोंदवला.



## शेतकरी प्रशिक्षण

### विषय : जैव संतृप्त गहू उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान व कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने अंतर्गत हसनापूर, कोळगाव व मंगरूळ बु., तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथील शेतकऱ्यांसाठी गहू पिकाचे जैव संतृप्त वाण एच.आय. १६३३ व एच.आय. १६३४ चा वापर करून अपेक्षित धान्य उत्पादन तसेच आहारातून जास्त प्रमाणात प्रथिने, लोह आणि जस्त हि पोषण द्रव्ये मिळविण्यासाठी प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर गहू पिक प्रात्यक्षिक रब्बी हंगाम २०२५ घेत आहोत. जैव संतृप्त गहू वाणांचे आहारातील महत्व आणि गहू उत्पादनामधील आधुनिक तंत्रज्ञान याची माहिती या प्रात्यक्षिकात सहभागी शेतकऱ्यांना व्हावी, यासाठी दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी जैव संतृप्त गहू उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत हसनापूर, कोळगाव व मंगरूळ बु., ता. शेवगाव येथील ७१ प्रशिक्षणार्थी या प्रशिक्षणात सहभागी झाले. त्यामध्ये गहू पिकाचे आहारातील महत्व, गहू पिकासाठी लागणारी जमीन व हवामान, एकात्मिक अन्नद्रव्य , किड व रोग व्यवस्थापन या विषयी शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. हा कार्यक्रम आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील, अध्यक्ष, श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी गहू जैव संतृप्त वाण प्रात्यक्षिकात सहभागी शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा देण्यात आल्या.



### विषय : रब्बी मका उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण.

नेवासा तालुक्यातील मौजे दिघी येथील प्रगतशील शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगामात घेतल्या जाणाऱ्या मका पिकाचे आधुनिक पिक उत्पादन तंत्रज्ञान विषयी शेतकरी प्रशिक्षणाचे दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी आयोजन करण्यात आले. रब्बी हंगामातील मका लागवडीसाठी जमीन निवडीपासून, हवामान, लागवडीसाठी पेरणी व बिजप्रक्रीया, मका लागवडीसाठी यंत्रे व औजारांचा वापर, एकात्मिक खत , किड व रोग व्यवस्थापन व काढणी आणि साठवण या विषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणास दिघी गावातील २५ शेतकरी उपस्थित होते.



### कांदा उत्पादनवाढीच्या सुधारित लागवड पद्धती

कांदा पिकाचे क्षेत्रामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. क्षेत्रामध्ये वाढ होत असली तरी रब्बी कांद्याची हेक्टरी उत्पादकता खूप कमी आहे. हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव–ने येथे कोळगाव व परिसरातील शेतकर्यांसाठी दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी कांदा उत्पादनवाढीच्या सुधारित लागवड पद्धती या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये २९ शेतकर्यांनी सहभाग नोंदवला.



**ऊस काढणी यंत्र चालकांचे कौशल्यवर्धन प्रशिक्षण :**

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने यथे दि. १६ ते १७ ऑक्टोंबर २०२५ रोजी ऊस काढणी यंत्र चालकांचे कौशल्यवर्धन प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षण कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण ३४ चालक सहभागी झाले होते. ऊस काढणी यंत्राचे तांत्रिक ज्ञान, यंत्र चालवताना येणाऱ्या समस्या व त्यावर उपाय तसेच यंत्र चालविण्याचे प्रात्यक्षिक इ. मुद्द्यावर चालकांना मार्गदर्शन करण्यात आले.





**विषय : परसबागेतील कुक्कुटपालन**

नेवासा, शेवगाव तालुक्यातील बऱ्याच प्रमाणात महिला शेतकरी शेतीला जोड धंदा म्हणून गावरण कुक्कुटपालन व्यवसाय करतात, शहरी भागामध्ये गावरण कोंबडीच्या अंडी तसेच मांस साठी चांगली मागणी आहे त्यासाठी ग्रामीण महिला शेतकऱ्यांनी कुक्कुट पालन प्रशिक्षणाची मागणी केली . त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगांव ने यांच्या मार्फत कुक्कुट पालन विषयावर शेतकरी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात गावरण कोंबडीचे लसीकरण ते ब्रूडिंग व्यवस्थापन तसेच कोंबड्यांचे आजार यावर चर्चा झाली. हे प्रशिक्षण २५ ऑक्टोबर २०२५ या रोजी पूर्ण झाले. या प्रशिक्षणात ५२ महिला शेतकर्यांनी सहभाग नोंदवला.



**विषय : दूध उत्पादन व्यवस्थापन .**

या प्रशिक्षणा साठी ३५ शेतकऱ्यांनी सहभाग नौदवला, यामध्ये प्रशिक्षणार्थींना दुग्धव्यवसायात झपाट्याने होत असलेले बदल, व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच लसीकरण करणे काळाची गरज आहे, लम्पी स्कीन रोगाचे लसीकरनाद्वारे नियंत्रण करणे, जनावरांचे आरोग्य कसे सांभाळावे व चारा व खुराक किती प्रमाणात द्यावा याबाबत डॉ. चंद्रशेखर गवळी – विषय विशेषज्ञ ( पशुधन उत्पादन ) यांनी मार्गदर्शन केले.९ डिसेंबर २०२५ रोजी सर्व प्रशिक्षणार्थींना कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर मुक्त संचार गोठ्याचे प्रात्यक्षीक दाखवण्यात आले.



**विस्तार उपक्रम**

**विषय : नाविन्यपूर्ण शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे संमेलन**

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने येथे दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, ऊस शेतीत नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान

वापरून उत्कृष्ट ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे संमेलन घेण्यात आले. या संमेलनात उपस्थित शेतकऱ्यांनी ऊस शेतीत त्यांनी वापरलेले तंत्रज्ञान व त्याचे झालेले फायदे याविषयी चर्चा घडवून आणण्यात आली.





**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी कार्यक्रम :**

दिनांक १९ नोव्हेंबर २०२५रोजी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत २१ व्या हप्त्याचे वितरण देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते थेट देशभरातील शेतकऱ्यांच्या खात्यात रु. १८००० करोड इतकी रक्कम वर्ग करण्यात आले. यावेळी पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्यप्रणाली द्वारे कोइम्बतुर, तामिळनाडू येथून थेट शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र दहिगाव येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील हे होते, यामध्ये एकूण १९४ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना डॉ. एस.एस.कौशिक यांनी पूर्व हंगामी ऊस लागवड तंत्रज्ञान या विषयावर रब्बी कांदा उत्पादन तंत्रज्ञान व गहू उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर विषय विशेषज्ञ उद्यानविद्या व कृषि विद्या यांनी मार्गदर्शन केले.



**केव्हीके शेती कट्टा :**

कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सामुहिक प्रयत्न करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने कोळगाव ता. शेवगाव या गावाची निवड केलेली आहे. या गावांमध्ये दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ व दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी केव्हीके शेती कट्टा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना स्थानिक शेती विषयक समस्या गृहीत धरून दुध्ल जनावरांमधील लंम्पी या चर्मरोगाचे व्यवस्थापन, रब्बी हंगामातील प्रमुख पिक हरभरा पिकातील किड व रोगाचे नियंत्रण, इतर रब्बी पिकाचे पेरणी पूर्वीचे नियोजन, कांदा पिकाचे बिजोत्पादन, शेतीमधील यांत्रिकीकरण, ऊस लागवड व ऊस खोडवा नियोजन याबद्दल केव्हीके चे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस.एस.कौशिक, व विषय विशेषज्ञ (पशुविज्ञान), विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी), विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार), प्रक्षेत्र व्यवस्थापक, कार्यक्रम सहायक (मृदा चाचणी) यांनी सहभा ग घेऊन मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ८० शेतकरी सहभागी झाले.





## कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने ची शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न

श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव–ने च्या ११ वी शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक दहिगाव–ने येथे दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा.श्री. काकासाहेब शिंदे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे आयसीएआर 'अटारी' पुणे चे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. सय्यद शाकिर अली यांची उपस्थिती लाभली. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.श्याम सुंदर कौशिक यांनी केव्हीके दहिगाव–ने चा प्रगती अहवालाचे सादरीकरण केले. तर श्री. माणिक लाखे, श्री. नारायण निबे, श्री. सचिन बडधे, श्री. नंदकिशोर दहातोंडे, इंजि. राहुल पाटील व डॉ. चंद्रशेखर गवळी यांनी आपआपले विभागाच्या प्रगती अहवालाचे सादरीकरण केले. या सल्लागार समितीच्या बैठकीस समितीचे सदस्य व महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान प्रसारक केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, कृषिविद्या विभागाचे डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. दत्तात्रय पाचारणे, उद्यानविद्या विभागाचे डॉ. अन्सार खान अत्तार, 'आत्मा' अहिल्यानगर चे प्रकल्प संचालक श्री.पी.एस.लाटे, राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन संचालनालयाचे डॉ. करू अप्पा, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड राहुरी चे व्यवस्थापक डॉ.सरोज वहाने, आकाशवाणी अहिल्यानगरचे कार्यक्रम अधिकारी श्री. सुदाम बटुळे, जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. पी. शिंदे, महाबीज चे जिल्हा व्यवस्थापक श्री. सुनिल दौंड, बँक ऑफ बडोदा, भेंडा शाखेचे चे व्यवस्थापक श्री. दिपक कुमार सिंह, जिल्हा बीज प्रमाणीकरण अधिकारी श्री. विक्रम अर्णव हे हजर होते. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे डॉ. सय्यद शाकिर अली यांनी शेतीमध्ये मूल्यवर्धन, यांत्रिकीकरण, हवामान आधारित शेती, आपत्कालीन पीक व्यवस्थापन, चा–यासाठी मुरघास व नैसर्गिक शेती चा प्रसार कृषि विज्ञान केंद्राकडून व्हावा असे नमूद केले. डॉ. आनंद चवई यांनी जमिनीचे व मानवाचे आरोग्य या दोन्ही गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे नमूद करताना नाचणी पिकाचे क्षेत्र वाढवण्यास संधी असल्याचे सांगितले. श्री. पी.एस.लाटे यांनी निर्यातक्षम फळपिके बाबत संधी असल्याचे सांगितले तर श्री. सुदाम बटुळे यांनी आकाशवाणी अहिल्यानगर शेती तंत्रज्ञान प्रसार व शेतक–यांच्या हिताकरिता सदैव तत्पर असल्याचे सांगितले. डॉ. वहाने व डॉ. दिघे यांनी जिल्ह्यामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी कशाप्रकारे संधी उपलब्ध आहेत याबद्दल आपले विचार प्रकट केले. यावेळी शेतकरी प्रतिनिधी सौ. कल्याणी मुरदारे, रुस्तुम नवले, शंकर जाधव, भगवान धूत, मुकुंद टाक, संजय तनपुरे, डॉ. शशिकांत शिंदे, दत्तात्रय शेरकर उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते गहू जैवसंतृप्त वाण व ऊस लागवड यंत्र या विषयावरील माहितीपत्रकांचे विमोचन करण्यात आले. बैठकीनंतर शास्त्रीय सल्लागार समितीच्या सदस्यांना प्रकाश हिंगे यांनी केव्हीके प्रक्षेत्रावरील चालू असलेल्या उपक्रमांना तसेच विविध प्रकल्पांना भेटी देऊन माहिती दिली.





**पूर्व प्रशिक्षनार्थी संमेलन :**

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने च्या माध्यमातून राबवील्या गेलेले विविध उपक्रम जसे की, शेतावर तंत्रज्ञान तपासणी, पथदर्शी प्रात्याक्षिके, विविध प्रकारची प्रशिक्षणे व विस्तार विषयक कार्यक्रम यामध्ये यापूर्वी सहभागी झालेल्या शेतक–यांचे संमेलन म्हणजेच पूर्वप्रशिक्षणार्थी संमेलन या कार्यक्रमाचे दि. १ डिसेंबर २०२५ रोजी केव्हीके दहिगाव–ने येथे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकुण ६२ शेतक–यांनी सहभाग घेतला. यावेळी केव्हीकेच्या सर्वच उपक्रम ते राबविण्याची पद्धत, त्यातून प्राप्त झालेले ज्ञान, त्यापासून मिळालेले फायदे व परिणाम, त्यामध्ये करावयाचे अपेक्षित बदल या सर्वच अनुषंगाने सहभाग शेतक–यांसमवेत चर्चा व विचारमंथन करण्यात आले. यावेळी एकुण ८ शेतक–यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यापुढे केव्हीके चे सर्वच उपक्रम आणखी प्रभावी कसे होतील यासाठी हा कार्यक्रम दिशादर्शक ठरेल.




**मा.आ. श्री सत्यजीत तांबे यांची कृषि विज्ञान केंद्रास भेट**

विधान परिषद सदस्य मा.आ. श्री सत्यजीत तांबे यांनी ०६.१०.२०२५ रोजी श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था कृषी विज्ञान केंद्र दहिगाव येथे भेट दिली. त्यांनी केव्हीकेच्या माध्यमातून स्थापन केलेल्या विविध प्रात्यक्षिक प्रकल्पांना भेट दिली आणि केव्हीके स्टाफ सोबत संवाद साधला. अभिप्रायामध्ये त्यांनी केव्हीके दहिगाव कृषी क्षेत्रात उत्कृष्ट काम करत आहे. केव्हीकेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांपर्यंत नवीन शोध आणि तंत्रज्ञान पोहोचवणे आहे आणि हे केव्हीके त्यांचे कर्तव्य अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडत आहे. केव्हीके कर्मचारी खूप उत्साही आणि सहाय्यक आहेत. असे नमूद केले.





**राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (NMNF) प्रकल्प अंतर्गत केव्हीकेच्या प्रक्षेत्रावर मॉडेल नैसर्गिक शेती फार्मची उभारणी**

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था कृषी विज्ञान केंद्र दहिगाव– ने यांनी राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत केव्हीके येथे मॉडेल नैसर्गिक शेती फार्मची उभारणी केली आहे. डॉ. पीडीएनएफ आणि एनएमएनएफ अंतर्गत स्वदेशी पशुधन (साहिवाल) युनिट, जीवामृत, जैव कीटकनाशक, बायोगॅस, गांडूळखत युनिट्स स्थापन केले आहेत आणि गहू– सोनामोती आणि बांशी, हरभरा–विजय, मोहरी–टीएएम १०८–१, जवस– एनएल–२६०, कांदा–लाल फुरसुंगी, लसूण भीमा पर्पल आणि फुले निलिमा, हळद– प्रगती, आणि आले–आयआयएसआर वर्धा आणि चारा पिके लुसर्न आणि पोकचोंग नेपियर याशिवाय दशपर्णी तयार करण्यासाठी आवश्यक असलेली वनस्पती एकाच ठिकाणी उपलब्ध केलेली आहे. केव्हीके येथे सेंद्रिय बियाणे उत्पादन आणि शेतकऱ्यांना पुरवठा करण्यासाठी पीजीएस प्रमाणपत्र अंतर्गत हे प्रमाणित केले आहे .

















# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर ॥)


**डॉ.एस.एस.कौशिक (प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ) कृ.वि.कें.दहिगाव-ने,ता.शेवगांव**

यांनी दहिगाव-ने येथे प्रसिध्द केले आहे.



Email : kvkdahigaon@gmail.com, Website : www.kvkdahigaon.org



**मुख्य संपादक : डॉ.एस.एस.कौशिक (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)**

सह संपादक : श्री.सचिन बडधे (विषय विशेषज्ञ,कृषि विस्तार)

**-: संपादक मंडळ :-**

श्री.माणिक लाखे (विषय विशेषज्ञ,पीक संरक्षक)

श्री.नंदकिशोर दहातोंडे (विषय विशेषज्ञ,उद्यानविद्या)

डॉ.चंद्रशेखर गवळी (विषय विशेषज्ञ,पशुविज्ञान)

श्री.प्रकाश हिंगे (प्रक्षेत्र व्यवस्थापन)

श्री.नारायण निबे (विषय विशेषज्ञ,कृषि विद्या)

इंजि.राहुल पाटील (विषय विशेषज्ञ,कृषि अभियांत्रिकी)

श्री.प्रकाश बहिरट (प्रयोगशाळा तंत्रज्ञ,मृद परिक्षण)

श्री.वैभव नगरकर (कार्यक्रम सहाय्यक,संगणक)